Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.net
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.net

Office of the Controller of Examinations
कार्यालय, परीक्षा नियंत्रक

संदर्भ क्र परीक्षा/समन्वय/२०१६/ दिनांक : २७.१०.२०१६

**शुध्दीपत्रक** (दि. २६/१०/२०१६)

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.**

**विषय : पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनाबाबत**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/२०१६/४६९६ दिनांक २४.१०.२०१६.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१६ मध्ये होत असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांची मूल्यांकन केंद्रावर १०० टक्के उपस्थिती आवश्यक तथा अनिवार्य आहे व आपल्या महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांना मूल्यांकन केंद्रात मूल्यांकनाच्या कार्यासाठी रुजू होणेस्तव तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. कार्यमुक्ती आदेशाची एक प्रत विद्यापीठास व एक प्रत मूल्यांकन केंद्रास पाठविण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली होती.

तथापि, मूल्यांकन केंद्रावर १०० टक्के उपस्थिती दिपावलीच्या सुट्टीत नसून १०० टक्के उपस्थिती म्हणजे आपल्या महाविद्यालयातील जे विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक आहेत, अशा त्या-त्या विषयनिहाय शिक्षकांनी मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

(उदा : एका महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त १० शिक्षक आहेत, तर अशा १० शिक्षकांनी मूल्यांकन करणे आवश्यक आहे.)

परीक्षेचे व उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे काम हे सांघिक कार्य असल्याने या कार्यात सर्वांनी सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. सर्वप्रथम विद्यार्थी केंद्रबिंदु मानून काम करणे व विद्यार्थ्यांचे हित जपणे सर्वांचे कर्तव्य असल्याने उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी विद्यापीठास सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे, जेणेकरुन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर होण्यास मदत होईल व त्याचा नकारात्मक परिणाम पुढील सत्रावर होणार नाही.

सबब, सदरील बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी) २७/१०/१६
परीक्षा नियंत्रक

याची एक प्रत सर्व संचालक, जिल्हा मूल्यांकन केंद्रे, संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.